आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५वाजता

२५ सप्टेंबर २०२४ -बुधवार

**ठळक बातम्या**

- मेक इन इंडिया उपक्रमाला १० वर्ष पूर्ण, विकसित आणि आत्मनिर्भर भारत बनवण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा निर्धार
- प्रधानमंत्री उद्या पुणे दौऱ्यावर/ २२ हजार कोटींहून अधिक रकमेच्या प्रकल्पांचं करणार भूमिपूजन आणि लोकार्पण
- जम्मू - काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ५४ टक्के मतदान
- गुजरातच्या सांबरकांठा जिल्ह्यात झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू
- ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि पुणे या जिल्ह्यांसाठी उद्या सकाळपर्यंत तर उदयासाठी नाशिक जिल्ह्यात हवामान विभागाकडून रेड अलर्ट

<><><><><>

केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया उपक्रमाला आज १० वर्ष पूर्ण झाली. याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांचं कौतुक केलं आहे. देशातल्या १४० कोटी नागरिकांचा एकत्र निर्धार यातून दिसून येतो. यामुळं विविध क्षेत्रातली निर्यात वाढली, उत्पादन क्षमतेचा विकास झाला आणि अर्थव्यवस्था मजबूत झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. सुधारणांच्या मार्गावर देशाची प्रगती सुरू राहील आणि एकत्रितरित्या आपण आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनवू असं त्यांनी सांगितलं.

गुंतवणूक वाढवणं, संशोधनाला चालना देणं, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणं आणि उत्पादन, आरेखन आणि नवोन्मेष या क्षेत्रात देशाला आघाडीचं स्थान मिळावं यासाठी सरकारनं हा उपक्रम सुरू केला होता. आता मोबाइल निर्यातीत भारत जगात दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. उत्पादन आधारित सवलत योजनेमुळं विविध क्षेत्रात सव्वा लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आली आहे. गेल्या दशकभरात तासाला एक या वेगानं स्टार्टअप देशात सुरू झाले आणि १५ लाख नागरिकांना रोजगार मिळाला. कोरोना लस उत्पादनातही भारतानं आघाडीच स्थान घेतलं आणि जगातल्या एकूण लशींपैकी निम्म्या भारतानं पुरवल्या.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या पुणे दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या हस्ते संध्याकाळी २२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजन आणि लोकार्पण होणार आहे. त्यात शिवाजीनगर ते स्वारगेट मेट्रो, बिडकीन औद्योगिक क्षेत्र, सोलापूर विमानतळाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाचा समावेश आहे. प्रधानमंत्री या दौऱ्यात भिडे वाड्यातल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचं स्मारक आणि स्वारगेट - कात्रज मेट्रोची पायाभरणी

करतील. ३ परम रुद्र संगणकांचं लोकार्पण, हवामान आणि वातावरण बदलासाठीची उच्च क्षमता कम्प्युटिंग यंत्रणा, महामार्गावर ट्रक चालकांसाठी सोयी सुविधा, विविध प्रकारचे इंधन भरण्यासाठीच्या ६ हजारांहून अधिक स्थानकांचं लोकर्पणही प्रधानमंत्री यावेळी करतील.

यानंतर प्रधानमंत्री एसपी कॉलेजच्या मैदानावर जनसभेला संबोधित करतील. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी इथल्या तयारीची पाहणी केली.

<><><><>

उद्योग, पायाभूत सुविधा, परकीय गुंतवणूक क्षेत्रात महाराष्ट्र राज्य देशात अव्वल असून राज्यात सेमीकंडक्टर क्षेत्रातही मोठी गुंतवणूक होत आहे आणि यामुळे महाराष्ट्र हे उद्योगस्नेही राज्य झालं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. इंडिया टुडे कॉनक्लेव्ह २०२४ या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेण्यात आली. दावोसमध्ये झालेली गुंतवणूक, सौरऊर्जा, सेमीकंडक्टर इत्यादी क्षेत्रांमध्ये वाढती गुंतवणूक यामुळे उद्योजकांचा विश्वास वाढत आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचं जाळं तयार होत आहे. वाढवण बंदर हा महाराष्ट्राचा कायापालट करणारा प्रकल्प आहे, तसंच तिथं विमानतळ सुरू करण्याचाही विचार आहे. नवी मुंबई विमानतळ लवकरच सुरू होणार आहे, असं त्यांनी नमूद केलं.

<><><><>

महाराष्ट्रात वाढवण आणि ग्रेट निकोबार बेटावर गालाथी खाडी इथं नवीन बंदरं विकसित करण्यात येत असल्याचं केंद्रीय बंदरविकास, नौकानयन आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी सांगितलं. नवीन सरकारचा १०० दिवसांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त ते वार्ताहरांशी बोलत होते. या बंदरांच्या निर्मितीनंतर देशात मोठ्या बंदरांची संख्या १४ होणार असल्याचं सांगून ते म्हणाले की देशातल्या बंदरांची एकूण माल हाताळणी क्षमता येत्या ५ वर्षात २कोटी TEU पासून ४ कोटी TEU पर्यंत वाढेल.

><><><><>

'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त १७ सप्टेंबर ते दिनांक २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्याचं आयोजन केलं आहे. यंदा त्यात "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" ही संकल्पना राबवली जात आहे. याबाबत मुंबई महनगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विशेष कार्य अधिकारी आनंद जगताप यांनी याबाबत माहिती दिली...

<><><><><>

जम्मू - काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात आज २६ जागांसाठी संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ५४ टक्के मतदान झालं. २३९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. या मतदारसंघांतल्या एकूण ३ हजार ५०२ मतदान केंद्रांवर आज सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. जम्मू प्रांतात रिआसी, राजौरी आणि पूँछ तर काश्मीर खोऱ्यात

श्रीनगर, बडगाव आणि गंदेरबाल या सहा जिल्ह्यांमधे झालेल्या मतदानासाठी सर्वत्र कडेकोट बंदोबस्त होता. या टप्प्यात सुमारे २५ लाख ७८ हजार मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

<><><><><>

झारखंड विधानसभेच्या निवडणुकीत भाजपा, संयुक्त जनता दल आणि अखिल झारखंड विद्यार्थी संघटनेसोबत युती करणार आहे. तिन्ही पक्षांमध्ये जागावाटपाची चर्चा शेवटच्या टप्प्यात आहे. पुढच्या आठवड्यात जागा वाटप जाहीर केलं जाईल, असं भाजपाचे राज्य सहप्रभारी हिमंता बिस्व शर्मा यांनी सांगितलं.

<><><><><>

गुजरातच्या सांबरकांठा जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला. या अपघातात १ जण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातग्रस्त प्रवासी शामलाजी इथे देवदर्शनासाठी गेले होते. परतीच्या वाटेवर त्यांची गाडी भरधाव वेगात ट्रेलरवर जाऊन धडकल्याने हा अपघात झाला.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या बदलापूर बालअत्याचार प्रकरणातला मुख्य आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यूप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं आज पोलिसांची चांगलीच हजेरी घेतली. अक्षय शिंदेनं पोलिसाकडचं शस्त्र हिसकावून गोळीबार केल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे. त्यावर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठानं पोलिसांवर प्रश्नांची सरबत्ती केली. गोळीबाराच्या बाबतीत प्रशिक्षित असलेले पोलिस आरोपीला आवरु शकले नाहीत. यावर कसा विश्वास ठेवायचा याला चकमक म्हणता येणार नाही, ही चकमक नाहीच, असं मत न्यायालयानं व्यक्त केलं. या चकमकीनंतर पोलिसांनी काय पावलं उचलली याची विचारणा न्यायालयानं केली. या घटनेच्या दृश्यांमधे फेरफार टाळण्यासाठी ते सिल केलं आहे का, या घटनेतलं शस्त्र पिस्तुल होतं, की रिव्हॉलवर, असे प्रश्न न्यायालयानं विचारले. या प्रकरणाची निपक्षपाती चौकशी अपेक्षित आहे. तशी ती होत नसल्याचं दिसलं, तर आम्हाला आदेश काढावा लागेल, असं न्यायालयानं बजावलं.

या प्रकरणी पोलिसांविरुद्ध गुन्हा नोंदवला जावा, तसंच या घटनेशी संबंधित सीसीटिव्ही चित्रण सुरक्षित ठेवलं जावं, अशी मागणी अक्षय शिंदेच्या वडलांच्या वकीलानं आजच्या सुनावणीदरम्यान केली.

<><><><><>

लाओस इथं सुरू असलेल्या २० वर्षांखालच्या आशिया कप फुटबाॅल पात्रता स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात आज भारतानं मंगोलियाचा ४-१ अशा गोल फरकानं पराभव केला. त्यामुळे भारताला जी गटात तीन गुण मिळाले आहेत.

<><><><><>

ज्येष्ठ चित्रपट निर्माती मधुरा जसराज यांचं आज मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. त्या ८६ वर्षांच्या होत्या. ओशिवरा स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले. प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडीत जसराज यांच्या मधुरा या पत्नी होत्या. चित्रपती व्ही शांताराम त्यांचे वडील होते.

पंडित जसराज यांच्या जीवनकार्यावर आधारित संगीत मार्तंड पंडित जसराज या चित्रपटाची निर्मिती त्यांनी केली होती. २०१० मधे आई तुझा आशीर्वाद हा चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केला. चित्रकला आणि शिल्पकलेतही त्यांनी भरीव योगदान दिलं.

<><><><>

कच्च्या तेलाचा सगळ्यात मोठा आयातदार असलेल्या चीनचा आर्थिक विकास आराखडा तिथल्या अर्थव्यवस्थेला  चालना देण्यासाठी सक्षम ठरेल का या बाबतच्या उलटसुलट चर्चांमुळे आज तेलाच्या दरात सुमारे दोन टक्के घसरण झाली. जागतिक बाजारात आज तेलाचा दर ७३ डॉलर  ७१ सेंट प्रतिबॅरल इतका राहिला.

<><><><>

कसोटी क्रिकेट फलंदाजी मानांकनात भारताच्या यशस्वी जयस्वाल आणि रिषभ पंत या दोघांनी पहिल्या दहा खेळाडूत स्थान मिळवलं आहे. ७५१ गुणांसह जयस्वालनं पाचवं तर पंतनं ७३१ गुणांसह सहावं स्थान पटकावलं आहे. चेन्नईत बांगलादेशाविरुद्धच्या सामन्यात भारताच्या विजयात या दोघांचा सिंहाचा वाटा होता.

<><><><>

ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी  आणि पुणे या जिल्ह्यांसाठी उद्या सकाळपर्यंत हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी अति जोरदार पावसाची दाट शक्यता असून उदया नाशिकमधे रेड अलर्ट दिला आहे. येत्या दोन दिवसांत पुणे, नाशिक, सातारा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत राज्यात अनेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. नैऋत्य मोसमी पावसाची परतीची रेषा कायम असून कालपासून कोकणात काही ठिकाणी, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस झाला.

<><><><>